<u>रे.क.न. ३/२०२४ मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा अर्जी कलम १–ब मध्ये नमुद केले वादीचे मिळकतीमध्ये अनाधिकाराने अतिक्रमण करुन कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये, वादीचे मिळकतीमध्ये असलेल्या शांततामय कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करु नये, वादींना दावा मिळकतीमधून बेदखल करू नये अशी तूर्तातूर्त मनाई ताकीद मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

<u>दावा मिळकतीचे वर्णन</u> –

०३. **अ)** मौजे नांदगांव, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील शेत जमीन–

अ.क्रं.	गट नंबर	ऐकणू क्षेत्र हे. आर.	आकार रु. पैसे
१.	३३	०.४४.०० पो.ख. हे ०.०५.०० एकूण क्षेत्र हे.०.४९.००	१.३७

त्यांच्या चतुःसिमा पुढील प्रमाणे–

पूर्वेस –रस्ता व लगत गट नं. २१,२८,२९,३२, श्री. मानसिंग खराडे वगैरे यांची मिळकत.

पश्चिमेस –गट नं. ३९ बाबू धोंडी कोगे पाटील यांची मिळकत.

दक्षीणेस – गट नं. ४० श्री.पाटील यांची मिळकत.

उत्तरेस –गट नं.३४ श्री. संभाजी गुरव वगैरे यांची मिळकत.

ब)वर कलम १–अ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीपैकी वादी यांचे मालकी कब्जे वहिवाटीचे क्षेत्र हे. ०.११.०० आर आकर रु. ०.३४ पै. यासी चतुःसिमा–

पूर्वेस –रस्ता व लगत गट नं. ३२ श्री. मानसिंग खराडे वगैरे यांची मिळकत.

पश्चिमेस –गट नं. ३९ बाबू धोंडी कोगे पाटील यांची मिळकत.

दक्षीणेस – गट नं. ४० श्री.पाटील यांची घर मिळकत.

उत्तरेस – प्रतिवादी यांची रजिस्टर खरेदीपत्र क्रं. २१४९/९९

प्रमाणेची याच गटातील शेत मिळकत.

<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> –

०४. वर नमुद केले प्रमाणे चतुःसिमेतील वादी यांचे मालकी व कब्जेहिवाटीचे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी बेकायदशीररित्या अनाधिकाराने अतिक्रमण करुन स्वतःचे मर्जीप्रमाणे, दांडगाव्याने नवीन घर मिळकतीचे बांधकाम त्याचे अंदाजे क्षेत्र पूर्व–पश्चिम २० फुट x दक्षिण–उत्तर २० फुट त्याच्या चतुःसिमा –

पूर्वेस	– गट नं. ३२ श्री. मानसिंग खराडे वगैरे यांची मिळकत.
पश्चिमेस	–गट नं. ३९ बाबू धोंडी कोगे पाटील यांची मिळकत.
दक्षीणेस	– गट नं. ४० श्री. यशवंत पाटील यांची घर मिळकत.
उत्तरेस	–वादी यांची याच गटातील उर्वरीत मिळकत.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

०५. कलम १–अ मध्ये नमूद केलेली मिळकत ही वादी व त्याचे अन्य भाऊबंद तुकाराम भिकाजी पाटील यांची वडीलार्जीत मालकी कब्जेवहिवाटीची मिळकत होय. दावा मिळकत गट नं. ३३ मध्ये तुकाराम भिकाजी पाटील यांचे नावे असणारे ८ आणे चे क्षेत्र व वादी यांचे पूर्वहक्कदार वडील यांचे नावे असणारे प्रत्येकी २ आणे क्षेत्र असे एकूण १२ आणे चे क्षेत्र

पोट खराब हे ०.३६.७४ आर क्षेत्र वादीचे पूर्वहक्कदार वडील व तुकाराम पाटील यांनी प्रतिवादी यांना रिजस्टर खरेदी दस्त नं. २१४९/१९९९ प्रमाणे चतुःसिमापूर्वक विक्री केले असून विक्री केले चतुःसिमेतील क्षेत्र सोडून दक्षिणेकडील उर्वरीत क्षेत्र वादी यांचे कब्जेवहिवाटीमध्ये असून सदर क्षेत्राशी प्रतिवादी यांचा कोणताही हक्क व अधिकार नव्हता अगर नाही. दावा गट नं. ३३ च्या पूर्व दिशेमधून नांदगांव–घुंगूर रस्ता गेला आहे. वादी हे दावा मिळकतीत सालोसाल भात व नाचणा इ. पिके घेत असतात.

०६. अशी वस्तुस्थिती असताना, प्रतिवादी यांनी वादी यांचे क्षेत्र बेकायदेशीररित्या हडप करणेच्या हेतूने दि. ०२.०१.२०२४ रोजी वादी किंवा अन्य कोणाचीही संमती, मान्यता न घेता दांडगाव्याने त्यांचे स्वतःचे मर्जीने अनाधिकाराने अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या वादीच्या कब्जेवहिवाटीमध्ये असलेल्या दावा मिळकतीमध्ये नवीर घर मिळकतीचे बांधकाम करणेकरीता पाया खुदाई करणे सुरु केले आहे. त्याचवेळी वादी यांनी प्रतिवादी यांना विचारणा केली असता प्रतिवादी क्रं. १ यांनी ''आम्ही याच ठिकाणी नवीन घर मिळकतीचे बांधकाम करणार आहोत, तुम्ही काय करायचे ते करा'' असे सांगितले. त्यावेळी वादी यांनी प्रतिवादी यांना सदर मिळकतीची मालकी व कब्जेवहिवाट ही वादी यांची आहे असे सांगितले तुमचा कोणताही संबंध नाही

तुम्ही तुमच्या मिळकतीमध्ये बांधकाम करा असे सांगितले असता प्रतिवादी यांनी वादी यांचे काहीही न ऐकता दावा अर्जी कलम १–ब मध्ये नमूद केले चतुःसिमेप्रमाणे अतिक्रमण करुन घर बांधकाम करणेच्या उद्देशाने पाया खुदाई करणे सुरुच केले आहे.

०७. दावा मिळकत ही शेत मिळकत असून सदरची मिळकत बिगरशेती झालेली नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करणे अगोदर कोणत्याही सक्षम प्राधिकारी नगररचना विभाग, तहसिलदार व जिल्हाधिकारी, ग्रामपंचायत यांचेकडून पूर्व परवानगी घेतलेली नाही. तसेच दावा मिळकतीमध्ये मोजणी देखील करुन घेतलेली नाही. प्रतिवादी हे वादी यांची मिळकत दांडगाव्याने बेकायदेशीरपणे हडप करणेच्या उद्देशाने वादींचे कब्जेवहिवाटीमध्ये असलेल्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करणेचा प्रयत्न करत आहेत. प्रतिवादी यांनी वादीचे कब्जेवहिवाटीमध्ये असलेल्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन बांधकाम केलेस वादी यांचे दावा मिळकतीमधील हक्क व अधिकार डावलले जाणार असून वादींचे मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यांचे कब्जेवहिवाटीचे मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करुन बांधकाम करु नये, वादी यांना दावा मिळकतीमधून बेदखल करु नये, याकरीता वादी यांनी सदरचा कायम मनाई अर्ज दाखल

केला आहे.

०८. प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्रं.२१ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी सदरचा मनाई अर्ज हा खोटा, चुकीचा, व काल्पनिक कथना आधारे दाखल केला असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. त्यामुळे सदरचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. वादी यांनी ज्या दावा मिळकतीच्या अनुषंगाने दावा दाखल केला आहे, त्या दावा मिळकतीमध्ये वादींची कधीही कब्जे वहिवाट नव्हती व नाही. तसेच वादींचे नांवे ७/१२ पत्रकी पोकळ नोंद असलेचे क्षेत्र हे नांदगांव ते घुंगूर या रस्त्याने बाधित झाले आहे त्यामुळे वादींना सदरचा दावा दाखल करणेचा कोणताही अधिकार नाही. वादी यांनी परिच्छेद क्रं. १ मध्ये नमूद केलेले दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असून दावा मिळकतीच्या चतुःसिमा देखील चुकीच्या आहत. वादी यांचे नांवे ७/१२ पत्रकी ११ आर. क्षेत्राची कधीही नोंद नव्हती व नाही. वादी क्रं. १ व २ यांची ७/१२ पत्रकी असणारी पोकळ नोंद विभक्त असून वादींनी तशी नोंद केली नसलेने दावा मिळकतीत वादीची वहिवाट नसलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादी यांनी दावा मिळकत म्हणून १–अ व १–ब म्हणून ज्या मिळकती दर्शविल्या आहेत अशा कोणत्याही मिळकती वादींच्या कब्जे वहिवाटीस कधीही नव्हत्या व नाहीत.

तसेच सोबत जोडलेला समजुतीचा हातनकाशा हा देखील चुकीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

०९. प्रतिवादी यांनी भू. गट क्रं. ३३ मध्ये कधीही अतिक्रमण केलेले नव्हते व नाही. तसेच प्रस्तुत प्रतिवादी करीत असलेले बांधकाम हे प्रतिवादींचेच मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीचे क्षेत्रामध्ये करीत असून सदर क्षेत्राशी वादींचा कोणताही हक्कसंबंध येत नव्हता व नाही. वादी यांनी परिच्छेद क्रं.१–ब मधील अतिक्रमणाबाबतचे केलेले वर्णन, मोजमाप व चतुःसिमा यादेखील पूर्णपणे चुकीच्या व मोघम स्वरुपाच्या नमूद केल्याने सकृतदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादींची कब्जेवहिवाट नसलेचे दिसून येते. तसेच प्रतिवादी यांनी वादींचे पूर्वहक्कदारांकडून खरेदी घेतलेली मिळकत ही पोटखराबसह खरेदी केलेली नसून पोटखराब क्षेत्र सोडून खरेदी केलेली आहे.

१०. दावा मिळकत भू गट क्रं.३३ ची मिळकत ही मूळची तुकाराम भिकाजी पाटील, दौलू गणपती पाटील व दगडू गणपती पाटील यांचे मालकीची होती. सदरची मिळकत नांदगाव गावी ''वाडीखाली शेत'' या नावाने ओळखली जाते. सदर मिळकत ही पोट खराबसह ४९ आर. इतकी आहे. सदर क्षेत्रापैकी तुकाराम गणपती पाटील व दगडू गणपती पाटील यांचे हिस्सेची प्रत्येकी २ आणे अशी एकूण ३६.७४ आर क्षेत्राची शेतमिळकत प्रतिवादी क्रं.

१, २, व ३ ते ५ चे पूर्वहक्कदार वडिल शिवाजी शंकर रेडेकर यांनी प्रत्येकी १/३ हिस्सेने दि. १०.१२.१९९९ रोजी खरेदी दस्त क्रं. २१४९/१९९९ चे दस्ताद्वारे पोटखराब क्षेत्र सोडून मिळकत खरेदी केलेली आहे. सदर खरेदीनुसार भू.गट क्रं. ३३ चे ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्रं. १,२ व ३ ते ५ चे पूर्वहक्कदार यांच्या नावाच्या नोंदी फेरफार क्रं. ५०७ ने झालेल्या आहेत. सदर खरेदीदस्ताप्रमाणे घेतलेली मिळकत ही ३६.७४ आर. असून महसुल अधिका–यांचे हस्तदोषामुळे भू गट क्रं. ३३ चे ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्रं. १,२, व ३ ते ५ यांचे नांवे प्रत्येकी ११ आर. क्षेत्राची नोंद झाली असून ती चुक दुरुस्ती होण्याकरीता महसूल न्यायालयाकडे दाद मागणी करणार आहे.

११. प्रतिवादी यांनी खरेदी केलेल्या ३६.७४ आर क्षेत्रामध्ये प्रतिवादी यांचे खरेदीतारखे पासून आजतागायत शांततामय कब्जे वहिवाट होती व आहे. सदर क्षेत्रात प्रतिवादी हे सालोसाल भात, भुईमूग, नाचणा अशी पावसाळी पिके घेत आहेत. प्रतिवादी यांनी सदरचे क्षेत्र खरेदी घेते समयी वादी यांचे पूर्वहक्कदार यांनी सध्या प्रतिवादींच्या कब्जे वहिवाटीस असणारे क्षेत्र हे प्रतिवादींच्या ताब्यात दिलेले आहे. तसेच भू. गट क्रं. ३३ मधील पूर्वबाजूने गेलेल्या नांदगाव–घुंगूर रस्त्याचे क्षेत्र सोडून उर्वरीत ३६.७४ आर क्षेत्र हे प्रतिवादींचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत होते व आहे. वादी यांचे पूर्वहक्कदार

यांनी प्रतिवादी यांना विक्री केलेले क्षेत्र वजा जाता उर्वरीत क्षेत्र म्हणजेच साधारणपणे १६ आर क्षेत्र हे नांदगाव ते घुंगूर या रस्त्याने बाधीत झाले असलेने त्याठिकाणी प्रतिवादींचे मालकी व कब्जे वहिवाटीचे क्षेत्र व्यतिरिक्त अन्य क्षेत्र शिल्लक नाही. त्यामुळे प्रतिवादींचे कब्जे वहिवाटीस असणा–या क्षेत्रा व्यतिरिक्त उर्वरीत क्षेत्रामध्ये वादींचे पूर्वहक्कदार अगर वादी यांची कधीही कब्जे वहिवाट नव्हती व नाही. प्रतिवादी हे त्यांचे कुटुंबियासह गावातील जुने घरी राहणेस असून सध्या कुटुंब विस्तारामुळे घरातील पाळीव जनावरांची सोय करणेचे उद्देशाने दि. २५.११.२०२३ रोजी भू.गट क्रं. ३३ मधील त्यांचे प्रत्यक्ष मालकी व कब्जे वहिवाटीचे क्षेत्रामध्ये जनावरांकरीता गोठा बांधण्याचे उद्देशाने म्हणून पाया खुदाई करुन दि. २६.१२.२०२३ रोजी पायाभरणी केलेली आहे.

१२. वादी यांनी प्रतिवादी यांचे सदरचे बांधकाम सुरु असताना कधीही विचारणा केलेली नाही. प्रतिवादी यांनी खाजगी मोजणीदार आर.जी.कांबळे यांचेकडून मोजणी करुन घेऊन हद्दी निश्चित करुन, जागेची खात्री करुन त्यानंतर जनावरांचे गोठयाचे बांधकाम सुरु केले आहे. सदर दाव्याच्या नोटीस लागून होण्यापूर्वीच प्रतिवादी यांचे ५ फुट उंचीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे वादी यांचा सदर मिळकतीशी कसलाही हक्कसंबंध येत नाही. तसेच गट नं. ३३ चे ७/१२ पत्रकी वादींच्या नावाची पोकळ

स्वरुपाची नोंद असल्यामुळे ७/१२ पत्रकी नमूद असणारे क्षेत्र हे वादींचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस नाही. त्यामुळे प्रतिवादींनी वादींचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण करणेचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे वादी यांचा तुर्तातुर्त मनाई नामंजूर करावा अगर मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे असे अतोनात नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादींना त्यांचेच मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची मिळकत उपभोगनेस अडथळा निर्माण होऊन प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे. याउलट सदरचा अर्ज नामंजूर केलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

१३. वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

अ.क्र.	**प्रश्नबिंदू**	**निष्कर्ष**
१.	वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ?	नाही.
२.	न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ?	नाही.
३.	उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे	नाही.

	अपरिमित नुकसान होईल ?	
४.	आदेश काय ?	अंतिम आदेशा प्रमाणे

१४. वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ व ३२ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

अ.क्रं.	**कागदाचा तपशील**	**दिनांक**	**दाखल कागद**
१.	भूमापन गट क्रं. ३३ मौजे नांदगाव, ता.शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील ७/१२ उतारा.	०३.०१.२०२४	स.शि.डिजीटल प्रत
२.	मौजे नांदगाव, ता.शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील उपअधिकक्षक भूमी अभिलेख, शाहुवाडी यांचेकडील नकाशा.	१८.०८.२०२१	स.शि.प्रत
३.	प्रतिवादी करीत असलेले अतिक्रमण बांधकामाचे फोटो (एकूण ४)	०४.०१.२०२४	अस्सल प्रत
४.	फोटोचे बील	०४.०१.२०२४	अस्सल प्रत
५.	दस्त क्रं. २१४९/१९९९ दुयय्म निबंधक, पन्हाळा यांचेकडील खरेदीपत्र.	२७.१२.२०२३	स.शि.प्रत
६.	वादीतर्फे साक्षीदार संभाजी तुकाराम गुरव यांचे शपथपत्र	०५.०१.२०२४	नि.क्रं.६

७.	वादीतर्फे साक्षीदार दगडू गणपती पाटील यांचे शपथपत्र	०५.०१.२०२४	नि.क्रं.७
८.	वादी नं.२ उदय दगडू पाटील यांचे शपथपत्र	०६.०१.२०२४	नि.क्रं.९
९.	मौजे नांदगाव, ता.शाहुवाडी, येथील गट क्रं.३३ चा भूमि अभिलेख कार्यालयाकडील गट नकाशा.	०८.०१.२०२४.	स.शि.प्रत

१५. प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. २८ वर दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

अ.क्रं.	**कागदाचा तपशील**	**दिनांक**	**दाखल कागद**
१.	प्रतिवादीतर्फे साक्षीदार हरि ज्ञानू खराडे यांचे शपथपत्र	११.०३.२०२४	नि.क्रं.२२
२.	प्रतिवादीतर्फे साक्षीदार यशवंत दत्तू गुरव यांचे शपथपत्र	११.०३.२०२४	नि.क्रं.२३
३.	प्रतिवादीतर्फे साक्षीदार प्रकाश संतू खराडे यांचे शपथपत्र	११.०३.२०२४	नि.क्रं.२४
४.	मौजे नांदगाव येथील फेरफार क्रं. ५०७	२७.०१.२०२३	झेरॉक्स
५.	मौजे नांदगाव येथील भू.गट क्रं. ३३ चा गट नकाशा	०९.०१.२०२४	झेरॉक्स
६.	प्रतिवादींचे सुरु असले	–	–

	बांधकामाचे फोटो (एकूण ४)		
७.	प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची खाजगी मोजणी करुन घेतलेबाबतचा नकाशा.	१६.१२.२०२३	झेरॉक्स

१६. दोन्ही बाजुंच्या दस्तऐवजाचे अवलोकन करता वादी व प्रतिवादी यांनी जी साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहे ती, शपथे विरुध्द शपथ (oath against oath) स्वरुपाची असल्याने व त्या साक्षीदारांचा उलटतपास झाला नसल्याने त्या प्रतिज्ञापत्रातील कथने आज रोजी ग्राहय धरता येणार नाहीत. तसेच दाव्यात विश्लेषीत केलेली छायाचित्रे ही भारतीय पुरावा कायदया अंतर्गत तरतुदीनुसार पुराव्यादरम्यान सिध्द होतील तत्पुर्वी ती प्रस्तुत अर्जासाठी विचारात घेण्यात येत नाहीत.

<u>का र ण मि मां सा</u>

<u>प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–</u>

१७. प्रस्तुत वादी हे तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यासाठी प्रथमदर्शनी केस त्यांच्या हक्कात आहे का हे सिध्द करतात का हे पाहणे महत्वाचे ठरते. दावा मिळकत १–अ ही वादीने त्यांचे अन्य भाऊबंद तुकाराम पाटील यांची वडिलार्जीत मालकी कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. दावा मिळकत गट नं.

३३ मध्ये तुकाराम भिकाजी पाटील यांच्या नांवे असल्याने ८ आण्याचे क्षेत्र व वादी यांचे पुर्वहक्कदार वडील यांच्या नांवे असणारे प्रत्येकी २ आणे क्षेत्र असे एकणू १२ आणेचे क्षेत्र पोट खराब असून हे.०.३६.७४ आर. क्षेत्र वादींचे पूर्व हक्कदार वडील व तुकाराम पाटील यांनी प्रतिवादी यांना रजिस्टर खरेदीदस्त नं. २१४९/१९९९ प्रमाणे चतुःसिमा पुर्वक विक्री केले असून विक्री केलेल्या चतुःसिमेतील क्षेत्र सोडून दक्षिणेकडील उर्वरीत क्षेत्र वादी यांच्या कब्जे वहिवाटीस आहेत.

१८. सदर कथनाच्या पुष्ठयर्थ वादीनी नि.क्रं. ३/१ ला भूमापन क्रं.३३ मौजे नांदगाव ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील सातबारा उतारा दाखल केला असून त्यामध्ये फेरफार क्रं. ४१२ अन्वये खाते क्रं. ४१ ला उदय दगडू पाटील व खाते क्रं. ४४ ला किरण दगडू पाटील यांना प्रत्येकी क्षेत्र ०.५.५० प्रत्येकी आकार ०.१७ असल्याचे दिसून येते. तसेच फेरफार क्रं. १५८९ अन्वये खाते क्रं. ३६१ ला शिवाजी शंकर रेडेकर, वैशाली शिवाजी रेडेकर, अजित शिवाजी रेडेकर, मंगेश शिवाजी रेडेकर यांचे ०.११.०० इतके क्षेत्र सामाईक असल्याचे दिसून येते. तसेच फेरफार क्रं. ५०७ अन्वये खाता क्रं. ३६२ ला तानाजी शंकर रेडेकर व खाते क्रं. ३६३ ला संभाजी शंकर रेडेकर या दोघांच्या नावे वेगवेगळे ०.११.०० इतके क्षेत्र दिसून येते. वादीचे

पूर्वहक्कदार वडील व तुकाराम पाटील यांनी प्रतिवादी यांना रजिस्टर खरेदीदस्त नं. २१४९/१९९९ प्रमाणे चतुःसिमापूर्वक रक्कम रु. ३५,०००/– ला गट नं. ३३ क्षेत्र ०.४४ आर. व पो.ख ०.५ आर एकूण एकूण ०.४९ आर. पैकी लिहून देणार १ ते ३ यांची प्रत्येकी ८ आणे हिश्याची क्षेत्र हे. ०.३६.७४ आर. अशी खरेदी दिलेली आहे.

१९. सदर खरेदीपत्रावरुन वादी यांनी प्रतिवादी यांना जमिन विक्री केल्याची बाब दिसून येते. प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी नि.क्रं. ३१ ला आपले म्हणणे सादर केले असून त्यामध्ये प्रतिवादी यांनी वादींच्या पूर्वहक्कदारांकडून खरेदी घेतलेली मिळकत ही पोट खराबासह खरेदी केलेली नसून. पोट खराब क्षेत्र सोडून खरेदी केली आहे. याकरीता प्रतिवादी यांनी मौजे नांदगाव येथील फेरफार क्रं. ५०७ अभिलेखावर दाखल केला असून त्यामध्ये दस्त क्रं. २१४९ दि. १०.१२.१९९९ रोजी रोख रक्कम रु. ३५,०००/– घेऊन शिवाजी शंकर रेडेकर, तानाजी शंकर रेडेकर संभाजी शंकर रेडेकर यांना खरेदी दिलेली आहे. सब रजिस्टर पन्हाळा यांचेकडील अ पत्रक खरेदी घेणार यांची नावे दाखल केली व खरेदी देणार यांची नांवे कमी केली अशा आशयाचा फेरफार दाखल केला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी भू गट क्रं. ३३ चा गट नकाशा व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची खाजगी मोजणी करुन घेतल्याचा

नकाशा देखील अभिलेखावर दाखल केला आहे.

२०. दावा मिळकत ही केवळ वादींच्याच कब्जेवहिवाटीची नूसन त्यमाध्ये प्रतिवादी यांचा खरेदीपत्रान्वये आलेला हक्क अबाधित आहे. तसेच फेरफार क्रं. ५०७ अन्वये प्रतिवादी यांनी त्यांचा दावा मिळकतीवर असलेला कब्जा सिध्द केलेला आहे. सबब, मुद्दा क्रं. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

<u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –

२१. प्रस्तुत दाव्यात प्रश्नबिंदू क्रं. १ चे उत्तर वादीचे विरोधात असल्याने न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने नाही. दावा मिळकत संदर्भात दस्तांवरुन प्रथमदर्शनी कब्जेवहिवाट ही केवळ वादीची आहे असे दिसत नाही. सबब तुर्त मनाई हुकुम वादींना दिल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता हिच जास्त आहे. सबब, प्रश्नबिंदू क्रं. २ व ३ नकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –

२२. प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात नसल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2024.04.22 17:41:32 +0530

V. A. Lavand-Kokate

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दि. १९.०४.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळे–खेरीवडे.